| MHSN110006562020 | नियमित दिवाणी दावा क्र.१३६/२०२०<br>प्रदीप मंडले / भगवान बुधावले |
| --- | --- |

## निशाणी ७० खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज या दाव्यातील वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दिलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, यातील प्रतिवादी क्र.२२ या दिनांक ०४/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना प्रतिवादी क्र.२३ ते २५ हे कायदेशीर वारस आहेत. यांच्या व्यतिरीक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२२ यांच्या नावाला कंस करण्यासाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. या अर्जाला प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्जास हरकत घेतली आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्जातील मजकूर हा खोटा व लबाडीचा आहे. अर्जासोबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी क्र.२२ यांना अन्य वारस नाहीत असे दाखविणारा पुरावाही वादी यांनी दिलेला नाही. त्यामुळे, त्यांचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केलेली आहे.

४. युक्तिवाद ऐकला. दाव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले. मयत प्रतिवादी क्र.२२ यांना प्रतिवादी क्र.२३ ते २५ हेच कायदेशीर वारस आहेत

असे कथन वादीने शपथेवर केलेले आहे. त्यामुळे, दाव्यात तांत्रीक दोष राहू नये यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. तसेच अशा दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यामध्ये १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत द्यावी अन्यथा योग्य ते आदेश करण्यात येतील.

३. सहा. अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये दुरुस्तीची नोंद घ्यावी.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR Date: 2024.08.17 16:23:47 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १७/०८/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 17/08/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 17/08/2024 |
| Order uploaded on | : | 17/08/2024 |